पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-०८१६/प्र.क्र.१०३/पोल-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ मे, २०१८.

<u>वाचा</u> :-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/पिंपरी चिंचवड आयु./२२५/२०१६, दि.२१.०७.२०१६.
२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/पिंपरी चिंचवड आयु./२२५/२०१६, दि.१०.०१.२०१८.
३) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.०२.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/ पिं.चिं.पो.आ/ २२५/२०१६, दि.०१.०३.२०१८.

<u>प्रस्तावना</u> :-

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या अधिनस्त सद्यस्थितीत एकुण ०४ परिमंडळ कार्यरत असून त्याअंतर्गत एकुण ३९ पोलीस ठाणी कार्यरत आहेत. पुणे पोलीस आयुक्तालयाअतंर्गत पुणे व पिंपरी चिंचवड या दोन महानगरपालिकांचे कार्यक्षेत्र समाविष्ट आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाची सदर व्याप्ती लक्षात घेऊन पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र.०१ येथे नमूद दिनांक २१.०७.२०१६ च्या पत्रान्वये पिंपरी चिंचवड येथे पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रात असलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची स्थापना सन १९८२ साली झालेली असून सदरची महानगरपालिका ही पुणे शहरालगत असून तिचे भौगोलीक स्थान मुंबईच्या दिशेने आहे. चाकण, तळेगाव येथे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहती स्थापन झाल्या असून त्या ठिकाणी नगरपालिकाही झाल्या आहेत. सदर भागामध्ये रहदारी व लोकसंख्येच्या प्रमाणात

मोठी वाढ झाली आहे. तसेच आळंदी व देहू ही महाराष्ट्रातील महत्वाची तिर्थक्षेत्रे असल्याने वारकरी सांप्रदायाचे लोक सदर ठिकाणी दर्शनाच्या निमित्ताने वारंवार येत असतात. त्यामुळे त्याठिकाणी वेळोवेळी कायदा व सुव्यवस्था राखणे व बंदोबस्त लावणे आवश्यक आहे. अशाप्रकारे भौगोलीक क्षेत्राचा विचार करता पुणे पोलीस आयुक्तालयापासून दूर असलेल्या क्षेत्रावर नियंत्रण ठेवणेकरीता सदर भागासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची आवश्यकता आहे. शहराची वाढती लोकसंख्या, नागरीकरण, औद्योगिरीकरण, शिक्षणसंस्था, वाहनांची संख्या, राजकीय वाढते पक्ष/ मतदार संघ आणि पोलीस ठाण्यांमध्ये तक्रारीत वाढ झालेली असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड येथे स्वतंत्र पोलीस आयुक्तालय निर्माण करणे आवश्यक झाले आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील लोकसंख्या अंदाजे १७.३० लाख इतकी आहे. प्रस्तावित पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय क्षेत्रामधील लोकसंख्या सुमारे २२ ते २३ लाख इतकी असून यामध्ये महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रातील काही गावांचा समावेश आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत एकूण ९ पोलीस स्टेशन कार्यरत असुन सदरची पोलीस स्टेशन ही पुणे पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ-३ मध्ये मोडत असुन पुणे शहरातील एकूण ४ मंडळापैकी ते सर्वात जास्त गुन्हे घडणारे परिमंडळ आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नागरी सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे नागरी वसाहती, गृहसंकुले, सोसायट्या यामध्ये झपाट्याने वाढ होत आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये लहान कंपन्या मोठया प्रमाणात असुन हिंजवडी परिसरात आयटी कंपन्या, महाविद्यालये, मोठया प्रमाणावर वाढलेली कारखानदारी व आय.टी. कंपन्यांमध्ये एकत्रित असलेले कामगार, राजकिय पक्ष/ कार्यकर्ते या पार्श्वभूमीवर या भागात अनेक कामगार संघटना अस्तित्त्वात असून गुन्ह्यांच्या प्रमाणामध्येही वाढ होत आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाचे विभाजन करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका व परिसराकरीता स्वतंत्र पोलीस आयुक्तालय निर्माण केल्यास सदर आयुक्तालयाचे कार्यक्षेत्र तुलनेने लहान असणार आहे. त्यामुळे सदर कार्यक्षेत्रामधील गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये कमी वेळेत प्रतिसाद देऊन गुन्ह्यांवर प्रभावी प्रतिबंध करणे व कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित राखणे सुकर होणार आहे.

प्रस्तावित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विविध कक्षांसाठी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या एकुण ४८४० पदांची आवश्यकता आहे. त्यापैकी पोलीस आयुक्त, पुणे शहर व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरुन पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची २२०७ पदे प्रस्तावित पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाकरीता वर्ग करण्यात येणार आहेत. यास्तव प्रस्तावित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी २६३३ पदे नव्याने निर्माण करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.०२.२०१८ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये प्रस्तावित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी नव्याने निर्माण करावयाची २६३३ पदे ही तीन टप्प्यात (पहिल्या टप्प्यात-६०%, दुसऱ्या टप्प्यात-२०% व तिसऱ्या टप्प्यात-२०%) निर्माण करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र.०४ येथे नमूद दिनांक ०१.०३.२०१८ अन्वये प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यान्वये त्यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यास तसेच सदर प्रस्तावित पोलीस आयुक्तालयासाठी पोलीस आयुक्त, पुणे शहर व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरुन पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची २२०७ पदे वर्ग करण्याची व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची एकुण २६३३ पदे ही तीन टप्प्यात (पहिल्या टप्प्यात १५६८ पदे, दुसऱ्या टप्प्यात ५५२ पदे व तिसऱ्या टप्प्यात ५१३ पदे) निर्माण करण्यास व तद्नुषंगाने येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्तावास मा. मंत्रिमंडळाने दिनांक १०.०४.२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

पोलीस आयुक्त, पुणे शहर व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करुन पिंपरी चिंचवड शहर व परिसराकरीता स्वतंत्र पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उक्त नवनिर्मित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकरीता सदर शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-अ"** मध्ये नमूद केलेली विविध संवर्गातील एकुण २६३३ पदे तीन टप्प्यामध्ये (पहिल्या टप्प्यात

१५६८ पदे, दुसऱ्या टप्प्यात ५५२ पदे व तिसऱ्या टप्प्यात ५१३ पदे) निर्माण करण्यास मान्यता देण्यात आहे. त्यापैकी सद्यस्थितीत सदर पोलीस आयुक्तालयासाठी सदर शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-ब"** मध्ये नमूद केलेली विविध संवर्गातील पहिल्या टप्प्यामधील १५६८ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यातील पदनिर्मितीनंतर दोन वर्षांनी दुसऱ्या टप्प्यात एकुण ५५२ पदे निर्माण करण्यास व तद्नंतर दुसऱ्या टप्प्यातील पदनिर्मितीनंतर दोन वर्षांनी तिसऱ्या टप्प्यात ५१३ पदे निर्माण करण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

३. पोलीस आयुक्त, पुणे शहर व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरुन सदर शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-क"** मध्ये नमूद केलेली विविध संवर्गातील एकुण २२०७ पदे उक्त नवनिर्मित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर संबंधित घटकप्रमुखांनी वर्ग करावीत.

४. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या कार्यक्षेत्रामधील १) सांगवी पोलीस ठाणे २) हिंजवडी पोलीस ठाणे ३) वाकड पोलीस ठाणे ४) पिंपरी पोलीस ठाणे ५) निगडी पोलीस ठाणे ६) चिंचवड पोलीस ठाणे ७) भोसरी पोलीस ठाणे ८) एमआयडीसी (भोसरी) पोलीस ठाणे ९) दिघी पोलीस ठाणे १०) चिखली पोलीस ठाणे व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रामधील १) चाकण पोलीस ठाणे २) आळंदी पोलीस ठाणे ३) देहूरोड पोलीस ठाणे ४) तळेगांव दाभाडे पोलीस ठाणे ५) तळेगांव एमआयडीसी पोलीस ठाणे अशी एकुण १५ पोलीस ठाणीं सदर पोलीस ठाण्यांसाठी मंजूर पदे, शासकीय इमारत, शासकीय निवासस्थाने, वाहने, शस्त्रे व दारुगोळा व इतर साधनसामुग्रीसह उक्त पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात येत आहेत.

५. उक्त नवनिर्मित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणारे कार्यक्षेत्र हे अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या पोलीस आयुक्त अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली राहील. सदर पोलीस आयुक्तालयाचे स्वरुप व रचना ही सदर शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-ड"** मधील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल.

६. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त यांना पोलीस आयुक्त म्हणून विविध कायदयांतर्गत असलेले अधिकार व शक्ती यांचा वापर करता येईल. तसेच वित्तीय अधिकार नियम १९७८ मधील भाग एक, अनुक्रमांक १ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड

यांना विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात येत आहे. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड हे महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखाली राहतील. महाराष्ट्र पोलीस अधिनियमामधील तरतुदीनुसार महासंचालक व पोलीस महानिरीक्षकांच्या आदेशान्वये पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड हे त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांच्या कक्षेत शस्त्रे, परेड, परिस्थिती व व्यक्ती यांचे निरीक्षण परस्पर संबंध, कामाचे वाटप, कायद्याचा अभ्यास, आदेश, कार्यवाही इत्यादी बाबत निर्देशित करतील. तसेच त्यात नियमितपणा आणतील. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड हे त्यांच्या नियंत्रणाखालील परिसरातील सुरक्षिततेबाबत जबाबदार राहतील.

७. उक्त पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यासाठी उपरोक्त विविध टप्प्यातील एकुण २६३३ पदे निर्माण करण्यासाठी येणारा आवर्ती खर्च रु.१७९,६९,९४,४६६/- (रु.एकशे एकोणऐंशी कोटी एकोणसत्तर लाख चौ-यान्नव हजार चारशे सहासष्ट फक्त) व अनावर्ती खर्च रु.२१२,८७,७५,२३३/- (कार्यालयीन खर्च रु.२४,०४,००,२३३/- + निवासस्थाने बांधकाम रु.१८८,८३,७५,०००/-) इतक्या खर्चास मंजुरी देण्यात येत आहे. सदरचा खर्च हा मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस बल (००) (०२) जिल्हा हॉस्पीटल (२०५५०१७७), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ११० ग्राम पोलीस (००) (०१) पोलीस पाटील व मेवास पोलीस (२०५५०२२१), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ संचालन व प्रशासन (००) (४१) गुप्तसेवा खर्च (२०५५००१४), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ संचालन व प्रशासन (००) (०२) पोलीसांची भरती (२०५५०६६९), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०५) कोंडवाडे (२०५५०२२१) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. हा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर करावा. तथापि प्रस्तावित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या प्रशासकीय कार्यालयासाठी व त्याअंतर्गत येणारी इतर कार्यालये/ विविध शाखांच्या कार्यालयासाठी इमारती/जागा भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक असणारा अनावर्ती खर्च उपलब्ध मंजूर अनुदानातून भागविण्यास मान्यता देण्यात आहे.

८. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय प्रत्यक्षात सुरु करण्याबाबतची तारीख स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

९. हा शासन निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील मान्यतेनुसार व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१३९/१८/व्यय-७, दिनांक १७.०४.२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२८१५१४३७२९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2018.05.28 15:14:57 +05'30'

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५. मा. मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) तथा पालकमंत्री, पुणे जिल्हा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव (अ. व सु.), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई/ पुणे/ ठाणे/ नवी मुंबई/ नाशिक/ नागपूर/ अमरावती/ औरंगाबाद/ सोलापूर.
१६. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर
१७. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा.
१८. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.
१९. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
२१. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
२२. वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
२३. निवडनस्ती कार्यासन पोल-३.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : अेपीओ-०८१६/प्र.क्र.१०३/पोल-३,

दिनांक: २८ मे, २०१८ चे सहपत्र.

“परिशिष्ट-अ”

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी निर्माण करावयाची एकुण २६३३ पदे

१) कार्यकारी दल

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रु.)	ग्रेड वेतन (रु.)	प्रस्तावित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी निर्माण करावयाची पदे			
				एकुण निर्माण करावयाची पदे	पहिल्या टप्प्यात निर्माण करावयाची पदे	दुसऱ्या टप्प्यात निर्माण करावयाची पदे	तिसऱ्या टप्प्यात निर्माण करावयाची पदे
१.	पोलीस आयुक्त	६७०००-७९०००	०	१	१	०	०
२.	अपर पोलीस आयुक्त	३७४००-६७०००	८९००	१	१	०	०
३.	पोलीस उप आयुक्त	१५६००-३९१००	७६००	२	२	०	०
४.	सहायक पोलीस आयुक्त	१५६००-३९१००	५४००	७	७	०	०
५.	पोलीस निरीक्षक	१५६००-३९१००	५०००	३६	२४	७	५
६.	सहायक पोलीस निरीक्षक	९३००-३४८००	४४००	५८	३६	१४	८
७.	पोलीस उपनिरीक्षक	९३००-३४८००	४३००	१२०	६५	२९	२६
८.	सहायक पोलीस उपनिरीक्षक	५२००-२०२००	२८००	१५१	८८	३२	३१
९.	पोलीस हवालदार	५२००-२०२००	२५००	२९०	१७४	६१	५५
१०.	पोलीस नाईक	५२००-२०२००	२४००	५६२	३३६	११४	११२
११.	पोलीस शिपाई	५२००-२०२००	२०००	१२५५	७४४	२५९	२५२
	एकुण			**२४८३**	**१४७८**	**५१६**	**४८९**

२) अकार्यकारी दल

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रु.)	ग्रेड वेतन (रु.)	प्रस्तावित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी निर्माण करावयाची पदे			
				एकुण निर्माण करावयाची पदे	पहिल्या टप्प्यात निर्माण करावयाची पदे	दुसऱ्या टप्प्यात निर्माण करावयाची पदे	तिसऱ्या टप्प्यात निर्माण करावयाची पदे
१.	प्रशासकिय अधिकारी	९३००-३४८००	४४००	१	१	०	०
२.	कार्यालय अधीक्षक	९३००-३४८००	४३००	२	१	१	०
३.	स्वीय सहायक	९३००-३४८००	४६००	१	१	०	०
४.	कनिष्ठ श्रेणी लघुलेखक	९३००-३४८००	४३००	३	१	१	१
५.	लेखा अधिकारी	९३००-३४८००	४६००	१	१	०	०
६.	सहायक लेखा अधिकारी	९३००-३४८००	४४००	१	१	०	०
७.	विधी अधिकारी	मानधन १५०००	०	४	२	१	१
८.	प्रमुख लिपीक	९३००-३४८००	४२००	६	४	१	१
९.	वरिष्ठ लिपीक	५२००-२०२००	२४००	१५	९	३	३
१०.	कनिष्ठ लिपीक	५२००-२०२००	१९००	३२	२०	६	६
११.	फोटोग्राफर	५२००-२०२००	२४००	०	०	०	०
१२.	फिंगर प्रिंट एक्स्पर्ट	५२००-२०२००	२४००	२	१	१	०
१३.	मोची	५२००-२०२००	१८००	२	१	१	०
१४.	हेडकुक	५२००-२०२००	१८००	२	१	१	०
१५.	सहायक हेड कुक	४४४०-७४४०	१६००	४	२	१	१

१६.	मेस सर्व्हंट	४४४०-७४४०	१३००	७	३	२	२
१७.	माळी	४४४०-७४४०	१३००	२	१	१	०
१८.	शिंपी	४४४०-७४४०	१६००	२	१	१	०
१९.	न्हावी	५२००-२०२००	१८००	२	१	१	०
२०.	कार्यालयीन शिपाई	४४४०-७४४०	१६००	१०	६	२	२
२१.	सफाईगार	४४४०-७४४०	१३००	२०	१२	४	४
	एकुण			**११९**	**७०**	**२८**	**२१**

३) पोलीस दवाखान्याकरीता आवश्यक मनुष्यबळ

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रु.)	ग्रेड वेतन (रु.)	प्रस्तावित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी निर्माण करावयाची पदे			
				एकुण निर्माण करावयाची पदे	पहिल्या टप्प्यात निर्माण करावयाची पदे	दुसऱ्या टप्प्यात निर्माण करावयाची पदे	तिसऱ्या टप्प्यात निर्माण करावयाची पदे
१.	वैद्यकिय अधिकारी वर्ग-१ फिजीशियन	१५६००-३९१००	५४००	१	१	०	०
२.	वैद्यकिय अधिकारी वर्ग-१ एमबीबीएस	१५६००-३९१००	५४००	२	१	१	०
३.	वैद्यकिय अधिकारी वर्ग-२ स्त्रीरोग तज्ञ	९३००-३४८००	५४००	१	१	०	०
४.	परिचारीका	९३००-३४८००	४३००	६	४	१	१
५.	मिश्रक	५२००-२०२००	२८००	१	१	०	०
६.	औषध निर्माण अधिकारी	५२००-२०२००	२८००	२	१	१	०
७.	प्रयोगशाळा तंत्रज्ञ (वैज्ञानिक सहायक)	९३००-३४८००	३१००	१	१	०	०
८.	वैज्ञानिक सहायक	९३००-३४८००	३१००	१	१	०	०
९.	क्ष-किरण तंत्रज्ञ	५२००-२०२००	४६००	१	१	०	०
१०.	ड्रेसर	५२००-२०२००	१५००	२	१	१	०
११.	वॉर्ड बॉय	४४४०-७४४०	१५००	४	२	१	१
१२.	आया	४४४०-७४४०	१५००	२	१	१	०
१३.	चपराशी	४४४०-७४४०	१५००	२	१	१	०
१४.	सफाईगार	४४४०-७४४०	१३००	४	२	१	१
१५.	कनिष्ठ श्रेणी लिपीक	५२००-२०२००	१९००	१	१	०	०
	एकुण			**३१**	**२०**	**८**	**३**

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : अेपीओ-०८१६/प्र.क्र.१०३/पोल-३,

दिनांक: २८ मे, २०१८ चे सहपत्र.

"परिशिष्ट-ब"

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी पहिल्या टप्प्यामधील ६०% प्रमाणे निर्माण करावयाची १५६८ पदे

१) कार्यकारी दल

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रु.)	ग्रेड वेतन (रु.)	पदसंख्या
१.	पोलीस आयुक्त	६७०००-७९०००	०	०१
२.	अपर पोलीस आयुक्त	३७४००-६७०००	८९००	०१
३.	पोलीस उप आयुक्त	१५६००-३९१००	७६००	०२
४.	सहायक पोलीस आयुक्त	१५६००-३९१००	५४००	०७
५.	पोलीस निरीक्षक	१५६००-३९१००	५०००	२४
६.	सहायक पोलीस निरीक्षक	९३००-३४८००	४४००	३६
७.	पोलीस उपनिरीक्षक	९३००-३४८००	४३००	६५
८.	सहायक पोलीस उपनिरीक्षक	५२००-२०२००	२८००	८८
९.	पोलीस हवालदार	५२००-२०२००	२५००	१७४
१०.	पोलीस नाईक	५२००-२०२००	२४००	३३६
११.	पोलीस शिपाई	५२००-२०२००	२०००	७४४
	एकुण			**१४७८**

२) अकार्यकारी दल

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रु.)	ग्रेड वेतन (रु.)	पदसंख्या
१.	प्रशासकिय अधिकारी	९३००-३४८००	४३००	१
२.	कार्यालय अधीक्षक	९३००-३४८००	४३००	१
३.	स्वीय सहायक	९३००-३४८००	४६००	१
४.	कनिष्ठ श्रेणी लघुलेखक	९३००-३४८००	४३००	१
५.	लेखा अधिकारी	९३००-३४८००	४६००	१
६.	सहायक लेखा अधिकारी	९३००-३४८००	४४००	१
७.	विधी अधिकारी	मानधन १५०००	०	२
८.	प्रमुख लिपीक	९३००-३४८००	४२००	४
९.	वरिष्ठ लिपीक	५२००-२०२००	२४००	९
१०.	कनिष्ठ लिपीक	५२००-२०२००	१९००	२०
११.	फोटोग्राफर	५२००-२०२००	२४००	०
१२.	फिंगर प्रिंट एक्स्पर्ट	५२००-२०२००	२४००	१
१३.	मोची	५२००-२०२००	१८००	१
१४.	हेडकुक	५२००-२०२००	१८००	१
१५.	सहायक हेड कुक	४४४०-७४४०	१६००	२
१६.	मेस सर्व्हंट	४४४०-७४४०	१३००	३
१७.	माळी	४४४०-७४४०	१३००	१
१८.	शिंपी	४४४०-७४४०	१६००	१
१९.	न्हावी	५२००-२०२००	१८००	१
२०.	कार्यालयीन शिपाई	४४४०-७४४०	१६००	६
२१.	सफाईगार	४४४०-७४४०	१३००	१२
	एकुण			**७०**

३) पोलीस दवाखान्याकरीता आवश्यक मनुष्यबळ

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रु.)	ग्रेड वेतन (रु.)	पदसंख्या
१.	वैद्यकिय अधिकारी वर्ग-१ फिजीशियन	१५६००-३९१००	५४००	१
२.	वैद्यकिय अधिकारी वर्ग-१ एमबीबीएस	१५६००-३९१००	५४००	१
३.	वैद्यकिय अधिकारी वर्ग-२ स्त्रीरोग तज्ञ	९३००-३४८००	५४००	१
४.	परिचारीका	९३००-३४८००	४३००	४
५.	मिश्रक	५२००-२०२००	२८००	१
६.	औषध निर्माण अधिकारी	५२००-२०२००	२८००	१
७.	प्रयोगशाळा तंत्रज्ञ (वैज्ञानिक सहायक)	९३००-३४८००	३१००	१
८.	वैज्ञानिक सहायक	९३००-३४८००	३१००	१
९.	क्ष-किरण तंत्रज्ञ	५२००-२०२००	४६००	१
१०.	ड्रेसर	५२००-२०२००	१५००	१
११.	वॉर्ड बॉय	४४४०-७४४०	१५००	२
१२.	आया	४४४०-७४४०	१५००	१
१३.	चपराशी	४४४०-७४४०	१५००	१
१४.	सफाईगार	४४४०-७४४०	१३००	२
१५.	कनिष्ठ श्रेणी लिपीक	५२००-२०२००	१९००	१
	एकुण			**२०**

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : अेपीओ-०८१६/प्र.क्र.१०३/पोल-३,
दिनांक: २८ मे, २०१८ चे सहपत्र.

"परिशिष्ट-क"

पोलीस आयुक्त, पुणे शहर व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवर मंजूर पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची नवनिर्मित पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर वर्ग होणारी पदे

अ.क्र.	पदनाम	पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थापनेवरुन वर्ग करण्यात येणारी पदे	पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरुन वर्ग करण्यात येणारी पदे	एकुण
१.	पोलीस उप आयुक्त	१	०	१
२.	सहायक पोलीस आयुक्त	१	०	१
३.	पोलीस निरीक्षक	२७	४	३१
४.	सहायक पोलीस निरीक्षक	२२	६	२८
५.	पोलीस उपनिरीक्षक	८२	१३	९५
६.	सहायक पोलीस उपनिरीक्षक	१८८	३४	२२२
७.	पोलीस हवालदार	३७६	७९	४५५
८.	पोलीस नाईक	३७१	८९	४६०
९.	पोलीस शिपाई	७८१	१२७	९०८
१०.	अकार्यकारी दल (मंत्रालयीन कर्मचारी व वर्ग-४)	१-लघुलेखक २-वरिष्ठ श्रेणी लिपीक १-कनिष्ठ श्रेणी लिपीक २-कार्यालयीन शिपाई	---	६
	एकुण पदसंख्या	**१८५५**	**३५२**	**२२०७**

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : अेपीओ-०८१६/प्र.क्र.१०३/पोल-३,
दिनांक: २८ मे, २०१८ चे सहपत्र.

"परिशिष्ट-ड"

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे स्वरुप व रचना

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>आवश्यक पद</th><th>दर्जा/ श्रेणी</th><th>अंतर्गत येणारे विभाग</th></tr>
<tr><td>१.</td><td>पोलीस आयुक्त</td><td>अपर पोलीस महासंचालक</td><td>पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्र</td></tr>
<tr><td>२.</td><td>अपर पोलीस आयुक्त</td><td>पोलीस उपमहानिरीक्षक</td><td>पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्र</td></tr>
<tr><td>३.</td><td>पोलीस उप आयुक्त (गुन्हे/ विशेष शाखा), मुख्यालय</td><td>पोलीस अधीक्षक/ पोलीस उप आयुक्त</td><td>१) सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा
२) सहा. पोलीस आयुक्त, विशेष शाखा
३)सहा. पोलीस आयुक्त, प्रशासन
४)सहा. पोलीस आयुक्त, वाहतुक</td></tr>
<tr><td rowspan="2">४.</td><td rowspan="2">पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १</td><td>पोलीस अधीक्षक/ पोलीस उप आयुक्त</td><td>१) सहा. पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग
२) सहा. पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग</td></tr>
<tr><td colspan="2">अ) सहा. पोलीस आयुक्त, देहूरोड विभाग अंतर्गत असलेली पोलीस ठाणी :-
१) देहूरोड पोलीस ठाणे.
२) तळेगांव पोलीस ठाणे.
३) तळेगांव एमआयडीसी पोलीस ठाणे.
४) निगडी पोलीस ठाणे.
आ) सहा.पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग अंतर्गत असलेली पोलीस ठाणी :-
१) पिंपरी पोलीस ठाणे.
२) चिंचवड पोलीस ठाणे.
३) भोसरी पोलीस ठाणे.
४) भोसरी एमआयडीसी पोलीस ठाणे .</td></tr>
</table>

५.	पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २	पोलीस अधीक्षक/ पोलीस उप आयुक्त	१) सहा.पोलीस आयुक्त, वाकड विभाग २) सहा. पोलीस आयुक्त, चाकण विभाग
		अ) सहा.पोलीस आयुक्त, वाकड विभाग अंतर्गत असलेली पोलीस ठाणी :- १) वाकड पोलीस ठाणे. २) हिंजवडी पोलीस ठाणे. ३) सांगवी पोलीस ठाणे. आ) सहा. पोलीस आयुक्त, चाकण विभाग अंतर्गत असलेली पोलीस ठाणी :- १) दिघी पोलीस ठाणे. २) चाकण पोलीस ठाणे. ३) आळंदी पोलीस ठाणे. ४) चिखली पोलीस ठाणे.	

*****